मंगळवार दि.१८ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१८३ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# घर बांधणाऱ्यांसाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय

# घरकुलांना मिळणार ५ ब्रास मोफत वाळू
# महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची घोषणा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**नागपूर (वृत्तसंस्था)**

घरकुल बांधणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. घरकुल बांधणाऱ्यांसाठी आता मोफत वाळू देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. राज्यातील घरकुल बांधणाऱ्यांना पाच ब्रास वाहू मोफत देण्यात येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाची घोषणा केली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे घरकुल बांधणाऱ्या लाखो लोकांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी मोफत वाळू देण्याच्या निर्णयाची घोषणा केली. याबाबत बोलताना ते म्हणाले, ज्या ठिकाणी लिलाव झालेले नाहीत. ज्या ठिकाणी आम्हाला एन्व्हायरमेंट क्लिअरन्स मिळाला आहे. त्या ठिकाणी वाळू घाटांचे लिलाव होईल. तसेच घरकुलांना पाच ब्रास मोफत रेती देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यासाठीही आम्ही तरतूद करणार आहोत, अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

एकंदरीत जेवढी मागणी असेल, तेवढा पुरवठा असे वाळू धोरण आपण तयार करत आहोत. त्यासाठी एम सँड धोरण येत आहे. त्यामध्ये दगड खाणींमधून येणाऱ्या वाळूसाठी आम्ही प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्टोन क्रशरसाठी प्रोत्साहन देत आहोत. त्या माध्यमातून दगडापासून मोठ्या प्रमाणात वाळू तयार होणार असून, त्यामुळे नदीतील वाळूची मागणी कमी होईल. तसेच येत्या दोन वर्षांत वाळूची मागणी आणि पुरवठा यामध्ये जी काही तफावत आहे ती दूर होईल, असे बावनकुळे यांनी सांगितले. प्रत्येक जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर स्टोन क्रशर लागणार आहेत. त्यातून वाळू तयार होणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.एकनाथ शिंदे हे काँग्रेसच्या वाटेवर होते, असा दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला. याबाबत चंद्रशेखर बावनकुळे यांना विचारले असता, त्यांनी त्यावर जास्त बोलणे टाळले. या राज्यात विकासाचे खूप प्रश्न शिल्लक आहेत. संजय राऊतांच्या बोलण्यावर महाराष्ट्राचे काही लक्ष नाही, माझेही लक्ष नाही, असे ते म्हणाले. आता जनतेला विकास पाहिजे. त्यामुळे आमच्यासमोर आता पॉलिटिकल प्रश्नांची, राजकीय सरबत्तीची प्रायोरिटी नाही. महाराष्ट्राच्या १४ कोटी जनतेला आमचे सरकार कसे न्याय देईल? जनतेला दिलेला संकल्प आम्ही पूर्ण कसा करू? याकडे आमचे लक्ष आहे. संजय राऊतांकडे आमचे लक्ष नाहीये, असे म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी संजय राऊतांच्या दाव्यावर उत्तर देणे टाळले.

# आळंदीत बसस्थानकात प्रवाशांसाठी आसनव्यवस्था की दुचाकी वाहनतळ?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**



श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी स्थळाने पवित्र असणाऱ्या अलंकापुरी नगरीमध्ये माऊलींच्या दर्शनासाठी हजारो भाविक येतात.परंतु आळंदीत आल्यानंतर पी.एम.पी.एम.एल.च्या गलथान कारभारामुळे ज्येष्ठ नागरीक,महिला, कामगार, शाळा कॉलेजचे विद्यार्थी यांचे आतोनात हाल होत आहेत. 'आंधळ दळतय आणि कुत्र पीठ खातय' दिव्या खाली अंधार अशी अवस्था प्रवाशांची झाली आहे. पी.एम.पी.एम.एल.चे जनसेवा हे ब्रीदवाक्य आहे.परंतु प्रवाशांना हीन सेवा दिली जात आहे.प्रवाशांना उन्हाळ्यात उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी पत्र्याची शेड उभारली असून प्रवाशांना बसण्यासाठी व्यवस्था केली परंतु त्या जागेवर २५ ते ३० दुचाकी पार्क केल्यामुळे प्रवाशांना उन्हात थांबून बसची प्रतिक्षा करावी लागते. खासगी वाहनांना आळंदी बसस्थानकात प्रवेश नाकारणाऱ्या बसस्थानक प्रमुखांना प्रवाशांची गैर सोय दिसत नाही का? पी.एम.पी.एम.एल.चे कर्मचारी प्रवाशांच्या बैठकीच्या जागी दुचाकी पार्क करतात याबाबत वारंवार तक्रार करूनही तक्रारदारांच्या अर्जांना केराची टोपली दाखवली जाते.पुणे स्टेशन, म. न. पा.भवन , स्वारगेट,वाघोली,हडपसर, देहू, बहुळ,चाकण,भोसरी,पिंपरी, चिंचवड, खराडी, वाय. सी. एम.रुग्णालय,हिंजवडी,बाणेर अशा विविध मार्गांवर बस सेवा सुरू आहे. पी. एम. पी. ला भरपूर उत्पन्न मिळते परंतु प्रवाशांच्या सोयी सुविधांकडे दुर्लक्ष होत आहे.आळंदी बसस्थानकात एकादशी ,रविवार व सुट्टींच्या दिवशी मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी होते. गर्दीचा फायदा घेत पाकिटमार ,मोबाईल चोरी, महिलांच्या गळ्यातील दागिने यांच्या चोऱ्या होतात.बसस्थानकात सी. सी. टीव्ही. कॅमेरे बसवावेत अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.दिघी आळंदी वाहतूक शाखेने आळंदी बसस्थानकात पार्क केलेल्या दुचाकींवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे .आळंदी शहरात नो पार्कींग मध्ये दुचाकी पार्क केल्यास गाड्या उचलून नेल्या जातात. वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाते. आळंदी बसस्थानकात आसन व्यवस्थे मधील दुचाकी वाहनांवर कारवाई का केली जात नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

## आ.विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश

लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**



आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती, त्यांच्या मागणीला यश आले असून उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा उल्लेख करून विधानसभेत बीड येथे नवीन विमानतळ उभारण्याची घोषणा केली. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून जिल्ह्यातील उद्योग वाढीला मोठा फायदा होणार आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सक्रिय सहभाग नोंदवत विविध विषयांची प्रभावी मांडणी केली आहे. अर्थमंत्री ना अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून बीड येथे नवीन विमानतळ उभारणीसाठी कार्यवाही सुरू करत असल्याची घोषणा केली. यामुळे बीड येथे नवीन विमानतळ उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. बीड जिल्हाधिकारी यांनी याबाबतच प्रस्ताव पाठवला असून त्यावर भूसंपादन आणि इतर सोपस्कार व्हावे तसेच इतर बाबीवर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे सांगून बीड येथे कमीत कमी तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारली जाईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला विकासाच्या टप्प्यात येता येणार आहे. पर्यटन आणि इतर व्यवसायाला चालना मिळेल असेही ते यावेळी म्हणाले.दरम्यान विजयसिंह पंडित यांनी विधानसभा सदस्य झाल्यानंतर आपल्या भागातील विकासाचे अनेक प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले. जलसंधारण, कृषी याबरोबरच विमानतळ उभा करण्याची मागणी करून त्यांनी आपल्या भविष्यवेधी नेतृत्वाची झलक दाखवली. आ. विजयसिंह पंडित यांनी बीडच्या विमानतळाचा प्रश्न निकाली काढल्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व स्तरातून त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.

# भोकरमध्ये छत्रपती संभाजी महाराज नगर या शहरातील हिंदू द्वेष्टा,क्रूरकर्मा औरंगजेब याची कबर हटविण्याकरीता आंदोलन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**




येथे दि.१७ रोजी तहसील कार्यालयासमोर उझबेगी परकीय आक्रमक बाबर याचा वंशज क्रूरकर्मा औरंगजेब याची कबर महाराष्ट्रातून हद्दपार करण्याकरिता विहिंप बजरंग दल हिंदु संघटनांनी आंदोलन करुन प्रशासनाकडे मुख्यमंत्री फडणविस यांना भोकर तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन सादर केले.

छ. संभाजी महाराज नगर या शहरात क्रूरकर्मा औरंगजेब याची कबर आहे. वास्तविक, औरंगजेब अहिल्यादेवी नगर येथे मेला व नंतर त्याचे प्रेत काडून ते छ. संभाजीनगर येथे पुरले व त्याठिकाणी त्याची कबर करण्यात आली. याच औरंगजेबाने शिख गुरु तेगबहादूर यांची क्रूर हत्या केली. शिख गुरु गोविंदसिंह यांच्या दोन बाल साहेबजाद्यांना ते केवळ मुस्लिम होत नाहीत म्हणून त्यांना भितीत जिवंतपणे चिणून मारण्यात आले धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची क्रुर हत्तेचे वर्णन करता येणार नाही अशी भयंकर यातनामय हत्या याने केली. श्री काशी विश्वेश्वराचे मंदिर याने फोडले, मथुरा येथे असणाऱ्या सुंदर मंदिरांचा यानेच विध्वंस केला. सोरटी सोमनाथाचे मंदिर पुन्हा एकदा यानेच फोडले त्र्यंबकेश्वर मंदिर, जेजुरी गड यावर हल्ले केले हजारो हिंदूंच्या प्रेतांच्या राशी गावाबाहेर रचून हिंदूंची भयानक क्रूर कत्तल केली. छत्रपती शाहु महाराजांचे अनेक वेळा धर्म परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. हिंदूचे मोठ्या प्रमाणावर धर्मातरण केले.असे निवेदनात नमुद केले असुन अश्या क्रूरकर्मा व आतातायी औरंगजेबाचे कुठलेही स्मारक अथवा कबर हि पूर्णपणे स्वतंत्र भारत देशात गुलामीचेच, अनत यातनांचे प्रतिक आहे. असे विहिंप बजरंग दल आणि हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी प्रशासनाकडे विनंती करुन, प्रशासनाने हि कबर पुर्णपणे नष्ट करावी. परकीयांचे कुठलेही नामोनिशाण हे नष्ट झाले पाहिजे. तरी प्रशासनाने योग्य पद्धतीने हि कबर पुर्णपणे काढून टाकावी. व हे न झाल्यास पूर्व सुचित करुन विश्व हिंदू परिषद, बजरंग दल हिंदू समाजा बरोबर छ. संभाजीनगरकडे कार सेवेसाठी कूच करतील व औरंगजेबाची कबर ध्वस्त करतील.असे निवेदनाद्वारे सुचित करुन नसते देत आंदोलन केले असुन निवेदनावर विश्व हिंदू परिषद, बजरंग दल देवगिरी प्रांत,जिल्हा किनवट प्रखंड भोकर येथील जिल्हा सहसंयोजक पंजाबराव हुलगुंडे,तालुका संयोजक बजरंग दल लक्ष्मण कोरंटलु,धर्माचार्य संपर्क प्रमुख राजु कानडे,आरती प्रमुख पवन चक्रवार,भाजपा तालुका अध्यक्ष गणेश कापसे,माधव मेकेवाड,शिवा जाधव,मनसे आकाश गेंटेवाड, माधव पवार,अंकुश रतनवार,सुनिल शहा,अमोल पोलादवार ,चंदू मुस्तापुरे यांसह विहिंप बजरंग दल कार्यकर्त्ये तसेच हिंदु संघटनांचे प्रतिनिधी यांच्या स्वाक्ष–या आहेत.यावेळी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

# मातृतीर्थातील बहुजन साहित्य संमेलनाचे प्रमुख आतिथ्य हाच मोठा बहुमान! आमदार श्वेताताई महाले,चिखली



लोकनेता न्यूज नेटवर्क

**चिखली । ज्ञानेश्वर बुधवत**

साहित्य क्षितिजावरील सिद्धहस्त सिताऱ्यांच्या समृध्द आविष्कारांचा बेहतरीण नजराणा घेऊन येणाऱ्या मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील नियोजित बहुजन साहित्य संघ, चिखली च्या बहुजन साहित्य संमेलन – २०२५ मधे विशेष अतिथी म्हणून उपस्थित रहावे अशा नम्र विनंती सह हृद्य निमंत्रणाचे सन्मान पत्र, ब. सा. संघाचे अध्यक्ष तथा ज्यांना साहित्यिक व संवैधानिक सामाजिक योगदानासाठी राममोहन अकादमी, वेस्ट बेंगाल तर्फे नुकताच इश्वरचंद्र विद्यासागर आणि राजा राममोहन रॉय नॅशनल वॉर्ड – २०२५ घोषित झाला आहे असे डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली, ज्येष्ठ कवी व सामाजिक कार्यकर्ते तथा संघाचे सचिव डॉ. डी. व्ही. खरात सर, आणि भावकवी तथा संघाचे पदाधिकारी अंकुश पडघान, बोरगाव काकडे, चिखली यांनी, चिखली, जि. बुलढाणा च्या लोकप्रिय आमदार मा. श्वेताताई महाले यांना ऐन रंगपंचमीच्या मुहूर्तावर सन्मानाने प्रदान केले, त्यावेळी त्यांनी वरील प्रमाणे उदगार काढले आणि वेळेवर उपस्थित होण्याचे व आवश्यक सहकार्याचेही आश्वासन दिले.

# बीड न.प.ने नियुक्त केलेल्या समर्थ व मोहिनीराज कंट्रक्शन,संदीप इलेक्ट्रिकल साबेर कंट्रक्शन व न.पच्या विरोधात १९ मार्च पासून उपोषण-अक्षय कोकाटे

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड | विजय रोडे

स्वर्णजयंती शहरी नगरोत्थान योजना,दलितवस्ती सुधार योजनेच्या भ्रष्टाचार कामाशी सखोल चौकशी करून कारवाई करावीत समर्थकंट्रक्शन,मोहिनीराज कंट्रक्शन, संदीप इलेक्ट्रिकल व साबेर कंट्रक्शन यांच्यावर गुन्हे दाखल करावीत बीड शहरातील नगर परिषद, बीड अंतर्गत लोकशाहीर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत होत असलेल्या सिमेंट रोड व नालीचे कामे निकृष्ट दर्जाची कामे होत असल्याने चौकशी होवून समर्थ कन्स्ट्रक्शनवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपोषण केले जाणार आहे. या मागणीसाठी रिपाई आठवले गटाचे शहर संघटक सचिव अक्षय कोकाटे १९ तारखे पासून उपोषण करणार आहेत.

बीड नगर परिषद अंतर्गत सध्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेच्या माध्यमातून बीड शहरातील विविध ठिकाणी समर्थ कन्स्ट्रक्शन मार्फत पुढील कामे चालु आहेत.बीड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र. ३ मध्ये रामतिर्थमध्ये आण्णाभाऊ साठे पुतळा ते दशरथ दळवी, जानु जगताप ते सीताबाई आरे, सीताबाई आरे ते सखाराम तांबरे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता नाली बांधकाम करणे. बीड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र. ३ मध्ये शुक्रवार पेठ मस्जिद ते विप्रनगर पुल पर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे.बीड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र.३ मध्ये हनुमान नगर, लहुजी साळवे चौक ते पवार यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे.बीड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र. ०४ मध्ये बलभीम नगर येथे वाल्मिकी सभागृहाच्या पाठीमागील बाजु ते दत्तात्रय टकले यांच्या घरापर्यंत सी.सी.रस्ता व नाली बांधकाम करणे.बीड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र. ०४ मध्ये रेगुले किराणा ते नरेश पिसाळ, वीरशैव कॉलनी, आदिती किराणा ते गवंडर यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे.उपरोक्त कामे व इतर ठिकाणी विविध कामे चालु असून बीड शहरामधील दलित वस्तीचे पूर्ण कामे हे समर्थ कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आल्याचे खात्रीपुर्वक माहिती प्राप्त झाली आहे. परंतू सदरील कामे हे निकृष्ट दर्जाचे असून दर्जाहीन आहेत. सदरचे कन्स्ट्रक्शन हे खोदकाम न करता, सिलींग न करता, पी.सी.सी. न करता, थेट थर टाकला जातो व उंची मनाल वाटेल तसे इंचामध्ये घेतात, ते अधिकाऱ्यांशी संगनमत करून इन्पेक्शन न घेऊ देता किंवा सॅम्पल न चेक करता होत आहेत. तसेच बोगस बील उचलण्यात येत आहेत. सदर कामाच्या संदर्भात बहुतांश ठिकाणी लांबी / रूंदी जास्त दाखवून त्या नियमानुसार कामे होत नाहीत. त्यामुळे बीड शहरातील जे रस्ता नालीचे पण काम चालु आहे. त्या समर्थ कन्स्ट्रक्शन वरती योग्य ती कार्यवाही होऊन कामामध्ये सुधारणा आणणे गरजेचे आहे.जर संबंधित समर्थ कन्स्ट्रक्शन वर कार्यवाही झाली नाही तर मी निर्वेदक आजरोजी जाहीर करतो की, बीड शहरातील सर्व कामांचा दर्जा योग्य रहाव व त्याचा सर्वसामान्य जनतेला न्याय



मिळावा म्हणून दिनांक १९ मार्च २०२५ रोजी न्यायिक व रितसर मार्गाने उपोषणास बसणार आहे. त्यामुळे वरील समर्थ कन्स्ट्रक्शनची योग्य ती चौकशी होऊन, चौकशीमध्ये दोषी आढळल्यास समर्थ कन्स्ट्रक्शनला काळ्या यादीत टाकून मान्यता रद्द करण्यात यावी व त्यांची देयके थांबविण्यात यावीत, ही अशी मागणी करण्यात आली आहे तर.सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाअभियान व दलित वस्ती योजनेमधून शहरात बसविण्यात येणाऱ्या सोलार पोल हायमास्ट दिवे बसविणाऱ्या कंन्स्ट्रक्शन कडून निकृष्ट दर्जाचे सामान वापरून साहित्य खरेदीत भ्रष्टाचार करणाऱ्या एजन्सीचे देयक थांबविन्यात यावीत बीड नगर परिषदेच्या वतीने नगरोत्थान महाअभियान व दलीत वस्ती अंतर्गत सोलार पोल हायमास्ट दिवे शहरात बसविण्यात येत आहेत. सदरील कामास ५ कोटी २५ लाख रुपयांची मान्यता देण्यात आली आहे व दलीत वस्ती अंतर्गत हायमास्ट दिवे व सोलार पोल बसविण्यासाठी १ कोटी रुपयांची मान्यता दिलेली आहे. सदरील कामे मा. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड तसेच न.प. अभियंता उदय ईपिल्ले यांच्या संबंधित मोहीनीराज कंन्स्ट्रक्शन व संदिप इलेक्ट्रीकल यांच्याकडून १ कोटी रुपये सोलार पोल व हायमास्ट दिवे बसविण्याचे काम करण्यात येत आहे व नगरोत्थान अभियानातून ५ कोटी २५ लाख रुपयाची सोलार पोल व हायमास्ट दिवे बसविण्याचे काम साबेर कन्स्ट्रक्शन, पाटोदा यांचेकडून करण्यात येत आहे.वरील दोन्ही कामात भ्रष्टाचार करण्यात आला असून या कामात निकृष्ट दर्जाचे सामान वापरून सामान खरेदीत न.प. मुख्याधिकारी यांच्या संगनमताने भ्रष्टाचार केला आहे. या प्रकरणी संबधिताची चौकशी करण्यात यावी, या करीता दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी आपणास निवेदन सादर करण्यात आले होते. परंतू आजपर्यंत कसलीही कारवाई आपल्याकडून करण्यात आलेली नाही. सोलार पोल हाय मासदीवे बसवण्यात आलेले साहित्य खरेदीत भ्रष्टाचार करणाऱ्या थांबवावेत.सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाअभियान व दलित वस्ती योजनेमधून शहरात बसविण्यात येणाऱ्या सोलार पोल हायमास्ट दिवे बसविणाऱ्या कंन्स्ट्रक्शन कडून निकृष्ट दर्जाचे सामान वापरून साहित्य खरेदीत भ्रष्टाचार करणाऱ्या एजन्सीचे देयक थांबविणे यावीत. बीड नगर परिषदेच्या वतीने नगरोत्थान महाअभियान व दलीत वस्ती अंतर्गत सोलार पोल हायमास्ट दिवे शहरात बसविण्यात येत आहेत. सदरील कामास ५ कोटी २५ लाख रुपयांची मान्यता देण्यात आली आहे व दलीत वस्ती अंतर्गत हायमास्ट दिवे व सोलार पोल बसविण्यासाठी १ कोटी रुपयांची मान्यता दिलेली आहे. सदरील कामे मा. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड तसेच न.प. अभियंता उदय ईपिल्ले यांच्या संबंधित मोहीनीराज कंन्स्ट्रक्शन व संदिप इलेक्ट्रीकल यांच्याकडून १ कोटी रुपये सोलार पोल व हायमास्ट दिवे बसविण्याचे काम करण्यात येत आहे व नगरोत्थान अभियानातून ५ कोटी २५ लाख रुपयाची सोलार पोल व हायमास्ट दिवे बसविण्याचे काम साबेर कन्स्ट्रक्शन, पाटोदा यांचेकडून करण्यात येत आहे.वरील दोन्ही कामात भ्रष्टाचार करण्यात आला असून या कामात निकृष्ट दर्जाचे सामान वापरून सामान खरेदीत न.प. मुख्याधिकारी यांच्या संगनमताने भ्रष्टाचार केला आहे. या प्रकरणी संबधिताची चौकशी करण्यात यावी, या करीता दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी आपणास निवेदन सादर करण्यात आले होते. परंतू आजपर्यंत कसलीही कारवाई आपल्याकडून करण्यात आलेली नाही, त्याची सखोल चौकशी करून एजन्सीला ब्लॅकलिस्ट करावे व कारवाई करावी. अन्यथा जिल्हाधिकारी कार्यासमोर १९ मार्च पासून लोकशाही मार्गाने उपोषण आंदोलन करण्यात येणार आहे. अशी माहिती बीड शहर रिपाई चे संघटक सचिव अक्षय कोकाटे यांनी निवेदनाद्वारे कळवले आहे.

# मेंदूचे विकार असणाऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या आरोग्य शिबिरास २० मार्च पासून प्रारंभ

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड | सुनील शिंदे

येथील राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्याने व जयवकील फाउंडेशन, बीजे वाडिया चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई, कमल उडवाडिया फाउंडेशन, एनएच-एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई, अन्नम, एओसीएन इंडिया, यांच्या संयुक्त विद्यमाने गत १४ वर्षापासून मेंदूचे विकार असणाऱ्या मुला-मुलीसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येते. या शिबिराचा हजारो रुग्णांना फायदा झाला असून हे शिबिर या रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. या वर्षी २७ वे शिबिर गुरुवार दि. २० मार्च पासून शहराच्या मगनपुरा नवा मोंढा येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात आयोजित करण्यात आले असल्याची माहिती राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष कमल कोठारी, सचिव प्रकाश मालपाणी सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज व शाळेचे मुख्याध्यापक नितिन निर्मल यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली आहे.




या वर्षी शिबिराचे हे पंधरावे वर्ष असून हे सत्ताविसाचे शिबिर गुरुवार दिनांक २० ते २२ मार्च या कालावधीत मगनपुरा, नवा मोंढा येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात डॉ. अनेता हेगडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात त्यांची तज्ञ डॉक्टरांची टिम रुग्णावर उपचार करणार आहे. आत्तापर्यंतच्या सब्बीस आरोग्य शिबिरात हजारी रुग्णांवर उपचार करण्यात आले. याचा तब्बल ७ हजारापेक्षा अधिक रुग्णांना लाभ झाला आहे. नेत्रशस्त्रक्रियेमुळे दृष्टिहीन असलेल्या रुग्णांना दृष्टी मिळाली तर हाडांच्या शस्त्रक्रियेनंतर उभे राहण्यास असमर्थ असणाऱ्या रुग्णांना आता चालता येऊ लागले आहे. अनेक रुग्णांचे चालताना तोल जाणे, फिट्स येणे व ऑटीझम अशा मेंदूशी संबंधित आजारातून आरोग्य शिबिरात घेतलेल्या सातत्याने उपचारामुळे बहुतांश जणांनी आजारावर मात केली आहे तर अनेक जन उपचाराने आजारातून बरे होणार आहेत. हे आरोग्य शिविर मेंदूचे विकार असणाऱ्या मुला-मुलीसाठी वरदान ठरले आहे. या शिबिरात उपचार घेण्यासाठी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगाना येथील राज्यातूनही मोठ्या संख्येने रुग्ण येत आहेत. प्रतिआरोग्य शिबिरात रुग्णा व त्यांच्या नातेवाईकांसाठी राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या वतीने निवास व जेवणाची व्यवस्वा करण्यात येते. आदिवासी व दुर्गम असलेल्या किनवट तालुक्यातील रुग्णांकरिता दि. २० व २१ मार्च रोजी प्रथम येणाऱ्या १५ नोंदणीकृत रुग्णांची मोफत वाहतुकीची व्यवस्था साने गुरुजी रुग्णालयाच्या वतीने करण्यात आली असल्याची माहिती प्रसिद्ध सर्जन डॉ. अशोक बेलखोडे यांनी दिली आहे. या शिबिरात नेत्र तपासणीही करण्यात येणार असून आवश्यक असणाऱ्यांना लेन्सकार्ट कंपनीच्या वतीने चष्म्यांचे वितरण करण्यात येणार आहे.

नविन रुग्णांनी त्वरित नोंदणी करावी नवीन रुग्णांसाठी पूर्व नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी नवीन रुग्णांनी आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालय, मगनपुरा नवा मॉंडा नदिड येथे प्रत्यक्ष जाऊन नोंदणी करावी तसेच शाळेत येणे शक्य नसणाऱ्या बाहेरगावच्या रुग्णांनी ८२०८११४८३२, ९०६७३७७५२० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.प्रतिवर्षाच्या शिविराप्रमाणे या वेळीही रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये यासाठी संस्था पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शन व मुख्याध्यापक नितीन निर्मल यांच्या नेतृत्वात आर. आर. मालपाणी मतिमंद व श्रीरामप्रताप मालपाणी मूकबधिर विद्यालयातील कर्मचारी जय्यत तयारी करीत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली आहे.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भंग करणारे विधेयक रद्द करण्याची निवेदनाद्वारे मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

गेवराई | प्रतिनिधी

सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ हे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भंग करणारे असून घटनेच्या मूलभूत अधिकाराविरोधात असल्यामुळ ते पूर्णतः रद्द करण्यात यावे ,अशी मागणी गेवराई तालुक्यातील लोकशाही मित्र तथा निवडणूक आयोग पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते कडूदास कांबळे , सत्यशोधक समाज महाराष्ट्र राज्य सचिव ड . सुभाष निकम , सामाजिक कार्यकर्ते प्रा राजेंद्र बरकसे, जेष्ठ विधिज्ञ ड. संदेश पोतदार, डॉ. उद्धव घोडके आदी कार्यकर्त्यांनी निवेदनाद्वारे तहसीलदारयांच्या मार्फत महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय मुंबई, विधान भवनाचे सचिव श्री जितेंद्र भोळे यांना केली आहे.

सचिव महोदय यांना दिलेल्या निवेदनामध्ये त्यांनी म्हटले आहे की, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ च्या अंतर्गत व्यक्ती व संघटना यांच्या



विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला जात आहे .हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे आणि भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मूलभूत हक्काचे उल्लंघन करणारे आहे. हे विधेयक अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट व्याख्या वापरून व्यक्ती व संघटनावर कठोर निर्बंध लादण्याचा प्रयत्न करत असून त्याचा गैरवापर सामाजिक राजकीय आणि विचारसरणीच्या आधारे दडपशाही करण्यासाठी केले जाऊ शकते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कोणत्याही लोकशाही देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असून त्यावर कोणत्याही प्रकारचे बंधने लादने हा लोकशाही मूल्यांचा आणि नागरिकांच्या हक्कांचा अवमान आहे. या विधेयकामुळे महाराष्ट्रामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर, पत्रकारिता आणि माध्यमावर, सामाजिक चळवळीवर आणि लोकशाही प्रक्रियेवर धोका निर्माण होईल . या विधेयकामुळे लोकशाही मूल्यांवर परिणाम होईल आणि नागरिकांचा सरकारला प्रश्न विचारण्याचा हक्क मर्यादित केला जाईल.

त्यामुळे या निवेदनाद्वारे निवेदकांनी प्रामुख्याने केलेल्या मागण्या अशा आहेत १) विधेयक पूर्णतः रद्द करण्यात यावे २) या विधेयकाबाबत व्यापक जनसंवाही घ्यावी आणि नागरी समाज तज्ञ कायदे तज्ञ आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांचे मत विचारात घ्यावे आणि ३) अभिव्यक्ती स्वातंत्र्य मध्यम स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याच्या दृष्टीने नवीन कायद्याचे मसुदे तयार करताना संविधानिक तज्ञांची मदत घ्यावी.या विधेयकाच्या संदर्भाने महाराष्ट्रातील तमाम जनतेने आक्षेप नोंदवून हे विधेयक पूर्णतः रद्द करण्यात यावे, अशा पद्धतीची मागणी सर्व स्तरातील कार्यकर्त्यांनी करावी असे आवाहनही यावेळी निवेदनकर्त्यांनी केले.

# तहसिल कार्यालयात १९ मार्चला जागतिक ग्राहक दिन

लोकनेता न्यूज नेटवर्क

बुलढाणा | ज्ञानेश्वर बुधवत

जिल्हा पुरवठा कार्यालय व तहसिल कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ग्राहक दिन साजरा केला जाणार असून यानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी १९




मार्च रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, बुलढाणा येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी शरद पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे, तहसीलदार व्ही.एस. कुमरे आणि निरीक्षण अधिकारी निलीमा उरकुडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ग्राहकांच्या हक्कांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हाळदा येथे संत तुकाराम महाराज बीज महोत्सवाची उत्साहात सांगता ; हजारो भाविक भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

लोकनेता न्यूज नेटवर्क

भोकर | रमाकांत जोशी

तालुक्यातील मौजे हाळदा येथे जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या बीज महोत्सवा निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता परमपूज्य बालयोगी स्वामी गजेंद्र चैतन्य जी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. त्यानिमित्त आयोजित महाप्रसादाचा लाभ परिसरातील हजारो भाविक भक्तांनी मोठ्या भक्तिभावाने घेतला.दिनांक ९ मार्च रोजी हरिनाम सप्ताहाची सुरुवात झाली होती.या सप्ताहात परमपूज्य बालयोगी स्वामी गजेंद्र चैतन्य जी महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून श्रीमद् देवी भागवत कथा महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते.या कथेला परिसरातील शेकडो भाविक भक्त व माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत होत्या.या श्रीमद् देवी भागवत कथेतून त्यांनी महादेवी भगवतीची चैतन्यमय मूर्ती ही माणसाला तेजस्वी बनवते व आत बाहेर माणूस निर्मळ होऊन सुंदर जीवन जगतो असा उपदेश त्यांनी केला.





तसेच सर्व तरुणांनी व्यसनापासून दूर राहून शक्तीची उपासना करावी व शरीर सुदृढ बनवून सुखाने संसार करावा. शरीर हे एक भगवंतांनी दिलेले मानवा साठी अमोल देणगी आहे तेव्हा या शरीराचा भगवंताच्या कार्यासाठी उपयोग करा व जीवनात सदैव संतांच्या संगतीत राहून सत्कर्म करीत जा असा उपदेश केला.

या हरिनाम सप्ताहात सात दिवस अनेक मान्यवर संतांनीही आपल्या ओजस्वी वाणीतून हरिकीर्तने करून मानव जीवनावर असलेल्या संतांच्या उपकाराचे चिंतन करून त्यांच्या उपकारातून उतराई व्हायची असेल तर त्यांनी सांगितलेल्या सत् मार्गानेच जीवन जगा असे सांगितले. जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांनी आपले संबंध आयुष्य मानवाच्या कल्याणासाठी समर्पित केले.तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता ।। या न्यायाने ते जीवन जगले म्हणून सदैव त्यांच्या शिकवणीचे आचरण करा व आपले जीवन सुगंधित बनवा असे मार्गदर्शन केले. या सप्ताहात सकाळी माणसांना संसारातुन जागे करण्यासाठी काकडा भजन,जगतगुरु तुकोबाराया यांच्या अभंग गाथेचे सामूहिक पारायण तसेच सायंकाळी ज्ञानेश्वर माऊलीचा हरिपाठ होऊन भजन मंडळींनी गावात अत्यंत मंगलमय वातावरणाची निर्माण केले.

दिनांक १५ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता गावातून श्रीमद् देवी भागवत महापुराण व तुकोबारायांची गाथा डोक्यावर घेऊन टाळ मृदंगाच्या गजरामध्ये पारायण कर्त्यांची गावातून भव्य शोभायात्रा निघाली.गावातून ग्राम प्रदक्षिणा करते वेळेस गावातील प्रत्येकांच्या दारा समोर सडा सारवन, रांगोळ्या व इष्ट देवतांचे फोटो ठेवण्यात आले. ही दिंडी दारासमोर येतात वीणा धारकांचे व पारायणकर्त्यांचे पाय धूऊन कुमकुम तिलक करून त्यांच्या वरुन आरती ओवाळण्यात आली.

दिनांक १६ मार्च रोजी परमपूज्य स्वामी बालयोगी गजेंद्र चैतन्य जी महाराज यांचे सकाळी काल्याचे किर्तन झाले.यातूनही त्यांनी मानवी जीवनाचे महत्त्व पटवून सांगितले व मिळालेला हा नर जन्म साधू संतांच्या संगतीने सत्कारणी लावा व याच जन्मी भगवंताची ओळख करून घ्या हीच खरी आपल्या मानव जन्माची इति कर्तव्यता आहे असे सांगून भगवान श्रीकृष्णाने गोकुळात केलेल्या काल्याची महती सांगून काल्याच्या माध्यमातून सर्व समाजाला गुण्यागोविंदाने एकत्रित राहण्याचा मौलिक संदेश त्यांनी दिला.त्यानंतर दुपारी बारा वाजता जगद्गुरु तुकोबाराय यांचा बीज महोत्सव गुलाल उधळून साजरा करण्यात आला. तद्नंतर त्यांच्या शुभ हस्ते दहीहंडी फोडून हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात आली व सर्वांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.या महाप्रसादाचा लाभ गावातील व परिसरातील हजारो भाविक भक्तांनी मोठ्या भक्ती भावाने घेतला.या हरिनाम सप्ताहातील सर्व धार्मिक कार्यक्रमास गावातील व परिसरातील शेकडो भाविक भक्तांची उपस्थिती राहत होती.हा हरिनाम सप्ताह यशस्वी होण्यासाठी गावातील सर्व पदाधिकारी, प्रतिष्ठित मंडळी,तरुण मंडळी व माता - भगिनींनी फार मोठे मोलाचे योगदान दिले.

## लोह्यात तिथीनुसार शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

# माजी आ.रोहिदास चव्हाण यांच्या हस्ते शिवरायांच्या पुर्णाकृती पुतळ्यास दुग्धाभिषेक

## डॉ.नवनाथ चव्हाणांकडून छावा चित्रपटाची शिवप्रेमींना दिली मेजवानी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी तिथीनुसार शिवजन्मोत्सव शिवसेनेचे ज्येष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण हे १९८० पासून लोह्यात मोठ्या उत्साहात साजरा करतात. दि.१७ मार्च रोजी शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.फाल्गुन वद्य ०३.शके १९४६ दि.(१७) मार्च २०२५ रोजी जूना लोहा शहरातील छत्रपती शिवरायांच्या पुर्णाकृती पुतळ्यास शिवसेना उबाठा चे ज्येष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या हस्ते सकाळी साडे दहा वाजता दुग्धाभिषेक मंत्रोच्चारात करण्यात आला.फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज की जय... ,जय भवानी जय शिवाजी...,अशा विविध घोषणांणी परिसर दणाणून गेला.दुग्धाभिषेकाचे थेट' फेसबुक' वर लाईव्ह करण्यात आले होते.तसेच चिमुकली मुलगी कस्तुरी केशवराव चव्हाण हिने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जिवन चरित्रावर गोड आवाजातील मनोगताने उपस्थित शिवप्रेमींची मनं जिंकली.यावेळी युवा नेते डॉ. नवनाथ (बापूसाहेब) चव्हाण,नगरसेवक संभाजी पाटील चव्हाण, माजी जेष्ठ नगरसेवक चंद्रकांत पाटील कळकेकर, माजी नगरसेवक रामकिशन पारेकर, माजी नगरसेवक दत्ता पेंटर कांबळे,सेवा सह सोसायटीचे चेअरमन गोविंदराव चव्हाण,संचालक नंदकुमार कहाळेकर, राजेश मुकदम, अशोक चव्हाण,संजय चव्हाण,अशोक केंद्रे, कल्याण जामगे,मारोती चव्हाण,सुर्यकांत चव्हाण बबरू पा पवार,पिंटू पा पवार, राम दांगटे, संग्राम चव्हाण, पंकज चव्हाण,राजू चव्हाण,शरद चव्हाण,रमेश चव्हाण, अमोल स्वामी,नारायण चव्हाण, विजय चव्हाण,रमेश चव्हाण,सूर्यकांत कोंडावार,दर्शन वसमतकर यांसह खेड्यापाड्यातून मोठ्या संख्येने तरुण शिवप्रेमी शिवभक्त सहभागी झाले होते.



### डॉ.नवनाथ चव्हाणांकडून छावा चित्रपटाची दिली मेजवानी

**शिवसेना उबाठा चे युवा नेते तथा सिनेट सदस्य डॉ.नवनाथ (बापूसाहेब) रोहिदास चव्हाण यांच्या वतीने शहरावासीयांना दिलेली मेजवानी म्हणजे जणू एक पर्वणीच ठरली.मराठ्यांच्या इतिहासातील रक्तरंजित क्रांतीपर्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित छावा चित्रपट सायंकाळी आठ वाजता लोहा शहरावासीयांना मारोती मंदिर समोरील प्रांगणात पडद्यावर दाखविण्यात आला.यावेळी शहरातील जेष्ठ नागरिक,महिला,पुरुष,तरूण युवा असंख्य शिवप्रेमी, शिवभक्तांचा जणू मोठ्या गर्दीचा महासागर लोटला होता.**

# छत्रपती संभाजीनगर या शहरातील हिंदू द्वेष्टा क्रूरकर्मा औरंग्यांची कबर हटविण्याची मुख्यमंत्री यांच्या कडे मागणी





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**

उझबेगी परकीय आक्रमक बाबर याचा वंशज क्रूरकर्मा औरंगजेब याची कबर छत्रपती संभाजी महाराज नगर या शहरात आहे. वास्तविक, औरंग्या अहिल्यादेवीनगर येथे मेला व नंतर त्याचे प्रेत काढून ते छत्रपती संभाजीनगर येथे पुरले व त्याठिकाणी त्याची कबर करण्यात आली.

याच औरंग्याने शिख गुरु तेगबहादूर यांची क्रूर हत्या केली. शिख गुरु गोविंदसिंह यांच्या दोन बाल साहेबजाद्यांना ते केवळ मुस्लिम होत नाहीत म्हणून त्यांना भिंतीत जिवंतपणी चिणून मारण्यात आले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची कूर हत्येचे वर्णन करता येणार नाही अशी भयंकर यातनामय हत्या याने केली. श्री.काशी विश्वेश्वराचे मंदिर याने फोडले, मथुरेला असणाऱ्या सुंदर मंदिरांचा यानेच विध्वंस केला. सोरटी सोमनाथाचे मंदिर पुन्हा एकदा यानेच फोडले. त्र्यंबकेश्वर मंदिर, जेजुरी गड यावर हल्ले केले. हजारो हिंदुंच्या प्रेतांच्या राशी गावाबाहेर रचून हिंदूंची भयानक क्रूर कत्तल केली. छत्रपती शाहू महाराजांचे अनेक वेळा धर्म परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. हिंदूंचे मोठ्या प्रमाणावर धर्मातरण केले.अश्या क्रूरकर्मा व आतातायी औरंगजेबाचे कुठलेही स्मारक अथवा कबर हि पुर्णपणे स्वतंत्र भारत देशात गुलामीचेच, अनंत यातनांचे प्रतिक आहे. आम्ही सर्व आपणांस विनंती करतो की, आपण हि कबर पर्णपणे नष्ट करावी. परकीयांचे कुठलेही नामोनिशाण हे नष्ट झाले पाहिजे, तरी आपण योग्य पदधतीने हि कबर पर्णपणे काढून टाकावी. व हे न झाल्यास पूर्व सूचित करून विश्व हिंदू परिषद बजरंग दल हिंदू समाजा बरोबर छत्रपती संभाजीनगरकडे कार सेवेसाठी कुच करतील व औरंग्याची कबर ध्वस्त करतील.

## महाविहार बावरीनगर दाभड येथे होणाऱ्या सामूहिक मंगल परिणय सोहळा आयोजनाबाबत बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

शांतीदूत प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने पुज्य भिक्खू बुद्धभूषण यांच्या अध्यक्षतेखाली सामूहिक मंगल परिणय सोहळ्याच्या आयोजन करण्यासंबंधी १४ मार्च रोजी एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीमध्ये महाविहार बावरीनगर दाभड नांदेड येथे शांतीदूत प्रतिष्ठानच्या वतीने दि. ११ मे २०२५ अर्थात बुद्ध पौर्णिमेच्या एकदिवस आधी सामूहिक मंगल परिणयाचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले आहे. तसेच ज्येष्ठ नागरिक तथा महिला श्रामणेर शिबिराचे आयोजन महाविहार बावरीनगर दाभड येथे करण्यात येईल व महाविहाराच्या वतीने दरवर्षीप्रमाणे बुद्धजयंतीच्या पूर्व संध्येस पू. भिक्खू संघाच्या उपस्थितीत बुद्धजयंतीनिमित्त



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.सदर बैठकीत खालील मान्यवरांच्या उपस्थितीत वरील विषयावर सांगोपांग चर्चा करण्यात आली. पू. भिख्यू बुद्धभूषण यांच्या अध्यक्षीय उपदेशानंतर अ‍ॅड. एम.जी. बादलगावकर यांनी आभार मानले. या बैठकीला पू. भिख्यू बुद्धभूषण प्रा. बी.एम. वाघमारे, प्र.डॉ. मिलींद भालेराव, जी.जी. कोलते, शुद्धोधन मांजरमकर, सुभाष काटकांबळे, शिवाजी सोनकांबळे, जनार्धन जमदाडे, सुरेश व्यवहारे, उत्तमराव भंडारे, एम.पी. गायकवाड, बापुराव मस्के, भगवान गायकवाड, डी.पी. गायकवाड आदी उपस्थित होते.

## तुकाराम नीती ग्रंथाचे प्रकाशन संपन्न!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोनपेठ । प्रतिनिधी**



दिनांक १६ मार्च २०२५ रविवार रोजी तुकाराम बीज सोहळ्याच्या मुहूर्तावर संत तुकाराम महाराज मंदिर, टाकळगव्हाण, ता.पाथरी जि.परभणी येथे प्रत्यक्ष तुकोबाराय मूर्ती समोर तुकोबांच्या ३७५ व्या बिजोत्सवात भव्य दिव्य कीर्तनात मा.श्री हरिष चैतन्य महाराज, मा.श्री शिवेंद्र चैतन्य महाराज, मा.सौ.प्रेरणाताई वरपुडकर, जेष्ठ मृदंगाचार्य ह.भ.प.प्रल्हाद महाराज परांडे लासीनकर, मृदंगाचार्य ह.भ.प. सुरेश महाराज पाथरीकर, संगीत विशारद ह.भ.प.मदन महाराज कदम, ह.भ.प.मोरे महाराज, ह.भ.प. लक्ष्मण महाराज पुरी, ह.भ.प.गोविंद पायघन महाराज आदी मान्यवर मंडळींच्या शुभहस्ते श्री वैजनाथ वाघमारे यांच्या शब्दवेध बुक हाऊस, छत्रपती संभाजी नगर प्रकाशित आणि प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये लिखित तुकाराम नीती ग्रंथाचे प्रकाशन संपन्न झाले. याप्रसंगी पंचक्रोशीतील महिला, पुरुष, आबालवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीला प्रास्ताविकात संत तुकाराम मंदिर, टाकळगव्हाण संस्थानचे अध्यक्ष मा.हरिष चैतन्य महाराजांनी आज समाजात वाचन संस्कृतीची रुजवणूक होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. तसेच मा.शिवेंद्र चैतन्य महाराजांनी आज तरुणांनी तुकोबांचा गाथा वाचून आपल्या जीवनाचे सार्थक करण्याचे आव्हान केले. याप्रसंगी मा.प्रेरणाताई वरपुडकर यांनी पुस्तक प्रकाशनाला शुभेच्छा दिल्या. तसेच सोनपेठ तालुक्यातील जेष्ठ मृदंगाचार्य ह.भ.प.श्री प्रल्हाद परांडे महाराजांनी पुस्तक लिहिल्याबद्दल कौतुक करतांना तुकाराम महाराज यांच्यावर लेखन होणे काळाची गरज असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्री कृष्णा आरबाड सर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीपणे घडवून आणण्यासाठी प्रा.प्रशांत कांबळे, प्रा.जयमहादेव राऊत, आमचा विद्यार्थी श्री शिवम हुके यांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी तुकाराम नीती पुस्तकाचे लेखक प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये यांनी सर्व मान्यवरांचे आणि दै.आधुनिक केसरीचे संपादक डॉ.प्रभुजी गोरे यांनी सतत तुकाराम नीती सदर प्रकाशित केल्याबद्दल सर्वांचे आभार मानतांना सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. विशेषतः जगद्गुरू तुकोबांचे जगावर अनंत उपकार आहेत याची प्रकर्षाने जाण करून देतांना, ज्याने गाथा हाती घेतला त्याचे जीवन कृतार्थ झाले असे सांगून ऋण व्यक्त केले. शेवटी तुकाराम तुकाराम भजन आणि संत तुकोबांच्या गजराने कार्यक्रमाची सांगता झाली.

### ग्रा.पं.कार्यालय पेठवडज व श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी यांच्या वतीने

# व्याख्याते डॉ.वसंत हंकारे यांचे न समजलेले आईबाप या विषयावर व्याख्यान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

गावातील आणि पंचक्रोशीतील युवक–युवती व पालकांसाठी उर्जात्मक व्याख्यानाचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालय पेठवडज व श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते मा.डॉ. वसंत हंकारे सर यांच्या जाहीर व्याख्यानाचे आयोजन बुधवार दि. १९ मार्च २०२५ वेळ : सायंकाळी ७ वाजता स्थळ : पेठवडज ता. कंधार जि. नांदेड येथे आयोजन केले असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा.आ.प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब आमदार, लोहा–कंधार विधानसभा मतदारसंघ उपस्थित राहणार आहेत.तसेच मा. शिवानंद मिनगीरे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अधिकारी, नांदेड, मा.रामेश्वर गोरे तहसिलदार, कंधार, मा. कैलास रेनेवाड विस्तार अधिकारी, पं. स. कंधार, आणि





प्रमुख पाहुणे म्हणून मा.सौ. अरुणा संगेवार मॅडम उपविभागीय अधिकारी उपविभाग कंधार,मा.सुधांश मांजरमकर सहायक गटविकास अधिकारी, पं.स. कंधार,मा.सौ.अनिता दत्ता गायकवाड सरपंच, ग्रा.पं. कार्यालय, पेठवडज, मा.सौ. सुनिताबाई अशोकराव डावकोरे अध्यक्षा : श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी लि पेठवडज ,स्वागताध्यक्ष मा.श्री.नारायण काळबा गायकवाड,कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.संजय तुबाकले प्रकल्प संचालक जि.प.नांदेड,मा.डॉ. अश्विनी जगताप मॅडम, मा.चंद्रकांत जाधव,मा.सौ. रेखाबाई आनंदराव राजे या मान्यवरांच्या उपस्थितीत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामपंचायत कार्यालय पेठवडज व श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी लि पेठवडज ता.कंधार जि.नांदेड यांच्या वतीने पेठवडज गावातील संपूर्ण गावकरी तसेच परीसरातील गावातील संपूर्ण गावकरी मंडळी,पालक, विद्यार्थी,विद्यार्थिनी, माता,भगिनी,युवक, युवती यांनी आपल्या मित्र परिवारा सोबत सहभागी होऊन या जाहीर व्याख्यानाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामपंचायत कार्यालय पेठवडज व श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी लि पेठवडज आणि समस्त गावकरी मंडळी पेठवडज यांनी केले आहे.अशी माहिती श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीचे तांत्रिक सल्लागार श्री अशोकराव डावकोरे साहेब यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितली आहे.

# सततची नापिकी व कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

तालुक्यातील डौर येथील शेतकऱ्याने सततची नापिकी व कर्जाला कंटाळून लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि.१६ मार्च रोजी दुपारी चार वाजताच्या सुमारास घडली. पंडीतराव किशनराव साबळे (वय–६०) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे.



तालुक्यातील डौर येथील शेतकरी पंडीतराव किशनराव साबळे (वय–६०) यांच्याकडे तीन एकर जमीन असून अल्पभूधारक शेतकरी होते. गेल्या काही महिन्यात सतत नापिकीचे संकट सुरू होते. त्यातच बँकेचे कर्ज होते. या विवंचनेत दि.१६ मार्च रोजी डौर शिवारातील एका शेतकऱ्याच्या शेतात लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. याप्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# मौजे शेळगाव छत्री येथे शिवजयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथे रयतेचा राजा स्वराज्याचे जनक वंदनीय छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीच्या निमित्ताने शिवरायांच्या प्रतिमेस माजी सरपंच मारुती पाटील सालेगाये,संजय पाटील आणेराये, मारुती मठपती महाराज, विठ्ठल पाटील आणेराये, प्रा.राम हाळे,नायगाव पाटबंधारे विभागाचे कालवा निरीक्षक आर व्ही मुपडे यांच्या हस्ते पूजन करून अभिवादन केल्यानंतर सतीश गंगाधरराव पोलीस पाटील आणेराये यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सामूहिकरीत्या राष्ट्रगीत घेण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे मौजे शेळगाव छत्री येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात समस्त गावकऱ्यांच्या वतीने अनेक जाती धर्मांच्या मावळ्यांना सोबत घेऊन स्वराज्य निर्माण करणारे रयतेचे राजे वंदनीय छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रसिद्ध पहेलवान राजेश आणेराये, माधव पाटील कुंभरगाये,मारुती पा.शहापुरे, रावसाहेब आणेराये, माधव कदम,वसंत सालेगाये, राहुल आणेराये,शिवाजी कदम,नागोराव वाघमारे, दत्ता निलावार, संभाजी निलावार, आनंद निलावार, शिवा अनेराये,दिगंबर ऐंजपवाड, यासह शिवजयंती मंडळाचे अध्यक्ष अमोल बालाजी कदम, उपाध्यक्ष संतोष माधवराव कदम,सचिव बाजीराव माधवराव कदम व विजय कदम, सुरेश कदम यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मा.खा.खतगावकर,मा.आ.पोकर्णा २३ मार्चला राष्ट्रवादीत प्रवेश करणार-आ.प्रतापराव चिखलीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । प्रतिनिधी**

दिनांक १७ मार्च २०२५ सोमवार रोजी देगलूर येथील शासकीय विश्रामगृहांमध्ये पत्रकार परिषदेत माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर यांच्यासह मीनल खतगावकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांचा अजित पवारांच्या राष्ट्रवादी प्रवेशाचा मुहूर्त ठरला असून, येत्या २३ मार्चला नरसी येथील जाहीर सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत ही मंडळी राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याची माहिती आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली. त्यावेळी पत्रकारांना बोलत असताना आ.प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले, खतगावकर यांनी अनेक वर्षे राज्यात, देशात नांदेडचे लोकप्रतिनिधित्व केले आहे. त्यामुळे त्यांच्या




प्रवेशाचा राष्ट्रवादी काँग्रेस ला फायदा होणार आहे. २३ मार्च रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, नवाब मलिक, बाबासाहेब पाटील या नेत्यांची नरसी येथील कार्यक्रमाला उपस्थिती राहणार आहे. महायुतीत आजपर्यंत फक्त भाजपने निलंबित केलेल्या मंडळींनाच राष्ट्रवादीत घेण्यात आले आहे. शिंदे गट किंवा भाजपच्या इतर मंडळींना पक्षात प्रवेश दिला नाही. महायुती भक्कम असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज्यपातळीवर नेते जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य राहणार आहे. खतगावकर हे ज्येष्ठ नेते आहेत. आम्ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करू. मी आता राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये थांबणार असून ज्या-ज्या पक्षात आजपर्यंत गेलो, त्या ठिकाणी मी प्रामाणिकपणे काम केले आहे. त्यामुळे आमची कुणाशीही स्पर्धा नाही, असेही आ.चिखलीकरांनी स्पष्ट केले. यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, बाळासाहेब रावणगावकर, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, माजी आ.अविनाश घाटे, माजी आ. मोहन हंबर्डे, सौ.मीनलताई खतगावकर, रामदास पाटील, जीवन घोगरे, देवेंद्र मोतेवार यांच्यासह देगलूर तालुक्यातील अनेक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### राष्ट्रवादी हा सेक्युलर पक्ष असल्या मुळे मी राष्ट्रवादीची निवड केली

**गेल्या ३० ते ३५ वर्षांच्या राजकीय जीवनात मला आजपर्यंत सर्व समाजाने मदत केली. काँग्रेसमध्येही मला खूप मानसन्मान मिळाला. परंतु राजकारण करताना परिस्थिती अशी होते की त्यावेळी पक्ष बदलावा लागतो. आपण ज्या भागाचे प्रतिनिधित्व करतो, त्या भागातील लोकांच्या समस्या सुटल्या पाहिजेत, हा मूळ उद्देश असतो. मला शिंदेसेनेकडूनही ऑफर होती. परंतु राष्ट्रवादी हा सेक्युलर पक्ष असल्यामुळे मी राष्ट्रवादीची निवड केली, अशी प्रतिक्रिया माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी दिली.**

## रयत सामाजिक प्रतिष्ठान चा राज्यस्तरीय समाजरत्न पत्रकारिता पुरस्कार भागवत वैद्य यांना प्रदान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

रयत सामाजिक प्रतिष्ठान चा राज्यस्तरीय समाजरत्न पत्रकारिता पुरस्कार दरवर्षी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या लोकांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात येतोय. यावर्षी रयत सामाजिक प्रतिष्ठान राज्यस्तरीय समाजरत्न पत्रकारिता पुरस्कार सोहळा २०२५ चा भागवत वैद्य यांना प्रदान करण्यात आला.यावेळी सामाजिक कार्यकर्ते, सिने अभिनेते उपस्तित होते. भागवत वैद्य यांनी आपली पत्रकारिता समाजसेवा म्हणून केली. अनेक लोकांचे प्रश्न आपल्या लेखणीतून सोडविले आहेत. लोकशाही पत्रकार संघाचे सं. अ. भागवत वैद्य यांचे खूप अभिनंदन सर्व स्तरातून होतं आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर भीमनगर जयंती उत्सव समिती

# अध्यक्ष राहुल ताटे, उपाध्यक्ष बापू ताटे, सचिव अँड.संजय रोडे, कोषाध्यक्ष संतोष आदोडे यांची बिनविरोध निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी वै,महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती २०२५ भीमनगर नूतन कार्यकारिणी आज रोजी प्रा.विलास रोडे यांच्या अध्यक्षतेखाली घोषित करण्यात आली.याबाबत सविस्तर माहिती अशी की, भिमनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे आज दि. १६ रोजी येत्या १४ एप्रिल रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठा उत्साहात संपन्न



करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे नियोजन करण्यात आले. यावेळी प्रा. विलास रोडे , सोपान ताटे, अँड. संजय रोडे, भारत ताटे, भालचंद्र ताटे यांनी जयंती कशाप्रकारे साजरी केली जावी याबाबत आपले विचार मांडले.यावेळी सर्वानुमते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती २०२५ च्या अध्यक्षपदी राहुल ताटे उपाध्यक्षपदी बापू ताटे, सचिवपदी अँड. संजय रोडे, कोषाध्यक्षपदी संतोष आदोडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर कार्यकारी सदस्यपदी अमोल रोडे, सुरज ताटे, महादू रोडे, शुभम तरकसे, संदीप ताटे यांची तर सल्लागार मंडळ पदी प्रा. विलास रोडे , सोपान ताटे भारत ताटे शीलभद्र ताटे, रवी रोडे, अशोक तरकसे, रणवीर चक्रे, विलास आदोडे, नामदेव सावंत, भानुदास जंगले आदींची निवड करण्यात आली. यावेळी भिमनगर येथील सर्व बौद्ध उपासक व उपासिका, युवक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखंड हरिनाम सप्ताह काल्याचे किर्तनानंतर गुणवंतांचा गौरव

## बालाजी पाटील घोरबांड यांचा स्तुत्य उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

उस्माननगर येथील सामाजिक युवा कार्यकर्ते व प्रतिष्ठित व्यापारी बालाजी दशरथ पाटील घोरबांड यांच्या वतीने येथील गावातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रगतीशील शेतकऱ्यांसह पत्रकार, शैक्षणिक, राजकीय , सामाजिक क्षेत्रात आणि पोलिस व महसूल प्रशासनात राहून सामाजिक बांधिलकी जपत जनतेची निस्वार्थ सेवा हीच ईश्वर सेवा समजून विविध विधायक कार्यक्रमात योगदान देणाऱ्या प्रतिष्ठित मान्यवरांचा गावातील ग्रामदैवत श्री महारूद्र मंदिरात आयोजित हरीनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यातील काल्याच्या किर्तन सोहळ्यात गुणवंत व्यक्तींचा कार्य गौरव करुन भविष्यातील वाटचालीत प्रोत्साहन मिळावे म्हणून विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी महापुरुष व देवतांची प्रतिमा , शाल , श्रीफळ, पुष्पहार देवुन गौरव करण्यात आला.

ग्रामदैवत श्री महारूद्र मंदीरात नुकताच अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथेचे आयोजन



करण्यात आले होते. यावेळी भागवत कथाकार म्हणून साध्वी अमृतानंद सरस्वती माताजी अकोळनेर जि.अहमदनगर यांच्या रसाळ वाणीतून कथा ऐकण्यासाठी महीला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहुन आस्वाद घेतला. अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथेच्या सांगताच्या काल्याच्या दिवशी ह.भ.प शंकर महाराज लोंढे सोनमांजरीकर ( संगित विशारद) यांच्या काल्याच्या किर्तन सोहळा दरम्यान येथील प्रतिष्ठित व्यापारी तथा सामाजिक कार्यकर्ते बालाजी दशरथराव पाटील घोरबांड यांनी समाज सेवा हीच ईश्वर सेवा समजून विधायक कार्यक्रमात सहभागी होऊन कार्य प्रभावीपणे राबवत असलेल्या विविध समाजातील नागरिक समाजाची सेवा करणाऱ्या पोलीस, भारतीय सैनिक , पत्रकार , प्रगतिशील शेतकरी , शैक्षणिक , राजकीय सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या गावकऱ्यांचा एक आभिमान म्हणून व त्यांच्या जिद्द , चिकाटी , मेहनतीला प्रोत्साहन देण्यासाठी भाविक भक्तांच्या उपस्थितीत महापुरुष व देवदेवतांच्या प्रतिमेची फोटो , शाल , श्रीफळ पुष्पहार घालून गौरव करण्यात आला.यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्तांची, विशेष करून महिलांची मोठी गर्दी होती. त्यानंतर नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## माजलगाव पशुसंवर्धन तालुका अधिकारी आणि पुरवठादार यांनी

# अनुसूचित जाती,जमातीच्या लाभार्थी यांची लूट थांबवावी-डॉ.संजय नाकलगावकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



माजलगाव सामाजिक न्याय विभाग राज्यातील तळागाळात गावपर्यंतच्या अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग, अपंग व दुर्बल घटक त्याचे जीवनमान उचवण्यासाठी पशुसंवर्धन विभाग मार्फत गाय, म्हैस दुधाळ गट योजना, शेळी, मेंढी योजना राबविण्यात येतात. माजलगाव पशुसंवर्धन तालुका अधिकारी डॉ. ताराबाई लांडे व त्याचे सहाय्यक डॉ रणजित शेजुळ आणि संबंधित पुरवठादार हे संगनमताने त्या लाभार्थी यांची लूट करत एक लाख साठ हजार रुपयांची योजना असताना लाभार्थ्यांना १,२०,००० देऊन प्रत्येक गटामागे ४० हजार गिळंकृत करण्याचा सपाटा लावला आहे, शेळी गटात सुद्धा १० शेळ्या आणि १ बोकड देणे आवश्यक आहे परंतु तसे न करता वजनाचे कारण दाखवत ६,७ शेळ्या देण्यात येतात यामध्ये समाज कल्याण अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन उपयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी वाटप केलेल्या गटाची व गट खरेदी सद्स्य सोबत घेत प्रत्येक्षप स्थळ पाहणी करत संबंधित अधिकारी यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्याचे आव्हानं माहिती अधिकार तालुका प्रचार प्रमुख डॉ. संजय नाकलगावकर यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# नवीन मोंढा उमरी येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा नवीन मोंढा उमरी येथे मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला यावेळी अनेक स्पर्धा,व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, नवीन मोंढा उमरी येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती



लोकप्रिय शेतकरी नेते चेअरमन श्री.मारोतराव पाटील कवळे गुरुजी ,राष्ट्रवादीचे नेते डॉ.विक्रम देशमुख, ज्येष्ठ नेते पांडुरंग अण्णा देशमुख गोरठेकर,माजी नगराध्यक्ष श्री सुभाषराव पेरेवार,रेल्वे डिव्हिजन चे मेंबर श्री पारसजी दर्डा,श्री अनिलजी दर्डा, श्री ज्ञानेश्वर पाटील कदम, माजी सैनिक विजय कदम,राजु अण्णा,पांडुरंग कोल्हेवाड,बालाजी पाटील पवार यांच्या सह अनेक मान्यवरांची व शिवप्रेमी युवक, युवती,जेष्ठ पुरूष,जेष्ठ महिला, विध्यार्थी यांची नवा मोंढा उमरी येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## आदरणीय नरेंद्र मोदी हर घर नल या योजनेचा जलजिवन मिशन अंतर्गत

# जलसम्राट आ.संतोष रावसाहेब पा.दानवे यांच्या प्रयत्नातून थेट बोराडे वाडी/कुकडी नळाद्वारे सोडण्यात आले पाणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील वाकडी कुकडी येथील ईश्वर पाटील बोराडे ग्रामपंचायत सदस्य वाकडी कुकडी , जलसम्राट आमदार संतोष पाटील दानवे यांच्या प्रयत्नामुळे थेट बोराडे वाडीला नळाद्वारे पाणी सोडण्यात आले गावकऱ्यांनी जलसम्राट संतोष पाटील दानवे यांचे मानले आभार.



कधी स्वप्नात ही विचार केला नव्हता की माझ्या बोराडे वाडीला नळाद्वारे पाणी पोहोचेल पण जलसम्राट आमदार संतोष भाऊ दानवे यांच्या दुर्दृष्टीतून व आदरणीय मा.जिल्हा परिषद विठ्ठल दादा चिचपुरे, व स्वतः माझ्या कल्पनेतून व माझ्या वाकडी कुकडी ग्रामपंचायतचे सरपंच नितीन देवकर, उपसरपंच रामकृष्ण सुसर, माजी सरपंच काशिनाथ शिरसाठ यांच्या संकल्पनेतून आज माझ्या बोराडे वाडीला पाणी पोहोचले मा. जिल्हा परिषद सदस्य, सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य भास्कर भाऊ निकम , बोराडे वाडी, वाकडी कुकडी गावकऱ्यांनी जलसम्राट आमदार संतोष भाऊ दानवे यांचे मानले आभार.

**ईश्वर पाटील बोराडे ,ग्रामपंचायत सदस्य वाकडी कुकडी,**



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904